लोकसत्ता पु.प.१.



# जंजिरे धारावी किल्ल्याजवळील मैदानातील हेलीपॅडचे स्थलांतर

## स्थानिक नागरिकांच्या विरोधामुळे निर्णयाचा फेरविचार

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** उत्तनच्या जंजिरे धारावी किल्यालगत असलेल्या मोकळ्या मैदानात जिल्हाधिकारीमार्फत हेलीपॅडची उभारणी केली जात आहे.मात्र या भागात मासळी सुखवण्यासाठी तसेच मुलांना खेळण्यासाठी ही एकमात्र जागा असल्याने यास स्थानिक नागरिकांनी कडाकून विरोध केला आहे. त्याची दखल घेऊन या निर्णयाचा फेरविचार करण्याचे प्रशासनाने मान्य केले आहे.

उत्तनच्या जंजिरे धारावी किल्याला लागून चिमाजी अप्पा मैदान आहे.पालिकेच्या विकास आराखड्यात हे मैदान किल्ले विकासासाठी आरक्षित करण्यात आले आहे.सध्या या मैदानावर स्थानिक मच्छिमार मासळी सुखावण्याचे काम करत असून उर्वरित जागेत मुल क्रिकेट खेळत असतात. दरम्यान प्रत्येक जिल्हात सात ते आठ हेलीपॅडची उभारणी करण्याचे आदेश शासनाने जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यानुसार भाईंदरमध्ये हेलिपॅड उभारण्यासाठी पश्चिम येथील सुभाषचंद्र बोस मैदानाची निवड करण्यात आली होती. मात्र यास विरोध झाल्यानंतर हे हेलिपॅड उत्तनच्या चिमाजी अप्पा मैदानात उभारण्याचे ठरवण्यात आले. यासाठी स्थानिक तहसीलदारांमार्फत स्थळ पाहणी करून राज्य सार्वजनिक बांधकाम विभागाला कामाचे कंत्राट देण्यात आले आहे.

> **“** उत्तन येथील चिमाजी अप्पा मैदानाची जागा ही शासकीय आहे. त्यामुळे या ठिकाणी राज्य सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत हेलीपॅड उभारण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मात्र आता स्थानिक नागरिकांनी विरोध केल्यामुळे निर्णयाचा फेरविचार केला जाईल.
>
> -दिनेश गौड, अप्पर तहसीलदार, मिरा-भाईंदर

मात्र यामुळे मैदान नष्ट होणार असल्याचे आरोप करत स्थानिक नागरिकांनी याविरोधात आंदोलन पुकारले आहे. यावरून गुरुवारी आमदार प्रताप सरनाईक यांनी मैदानाला भेट देऊन काम रद्द करण्याची मागणी दूरध्वनीवरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. याबाबत मुख्यमंत्र्यांनी देखील जिल्हाधिकाऱ्यांना हेलीपॅड स्थलांतरीत करण्याचे सांगितले असल्याचा दावा सरनाईक यांनी केला आहे.

CamScanner

लोकसत्ता पु.पा.४.

# वाहतूक धोरणावरून संभ्रम

## भाईंदरमधील दिरंगाईबाबत पोलीस, पालिकेचे एकमेकांकडे बोट

**लोकसत्ता वार्ताहर**



**भाईंदर :** मिरा-भाईंदर शहरासाठी पोलीस आयुक्तालयाने जाहीर केलेल्या वाहतूक धोरणाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. यात शहरात मार्गदर्शक फलक उभारण्यासाठी पोलिसांनी पालिकेकडे मागणी केल्याचा दावा केला आहे. मात्र याबाबत पुरेसा पाठपुरावा होत नसल्याचे महापालिकेचे म्हणणे आहे. त्यामुळे दोघांमधील अपुऱ्या संवादामुळे वाहतूक धोरण रखडल्याची बाब समोर आली आहे.

मिरा रोड व भाईंदर शहरात सध्या वाढत्या वाहनांच्या संख्येमुळे वाहतूक नियोजन करणे कठीण होऊ लागले आहे. यामुळे वाहतूक कोंडी, वाहनतळ प्रश्न अशा अनेक समस्यांना नागरिकांना सामोरे जावे लागत आहे. शहरातील वाहतूक समस्या सुटावी यासाठी तीन वर्षांत प्रथमच पोलीस आयुक्तालयाकडून पाऊल उचलण्यात आले आहे. यामध्ये आयुक्तालयातील वाहतूक विभागाने भाईंदर महापालिकेच्या मदतीने शहराचे सर्वेक्षण करून विशेष असे वाहतूक धोरण निश्चित केले आहे. या धोरणाची ऑक्टोबर २०२३ मध्ये घोषणा करण्यात आली होती. शहरातील ५७ ठिकाणी पार्किंग व नो पार्किंग, नऊ एकदिशा मार्ग व दोन ठिकाणी प्रवेश बंदी करण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु प्रत्यक्ष या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी सुरुवातीला सूचना फलक, निर्देशक फलक लागणे गरजेचे आहे. यासाठी मीरा भाईंदर महापालिकेला पोलीस आयुक्तालयाच्या वाहतूक विभागाने प्रस्ताव तयार करून दिशादर्शक फलक, मार्गदर्शक सूचना असे फलक लावण्यात यावे, अशी मागणी केली आहे. मात्र सहा महिन्यानंतर देखील पालिकेकडून फलक लावण्यात न आल्याने वाहतूक धोरणाची अंमलबजावणी करण्यास वाहतूक पोलिसांना अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. याबाबत महापालिकेचे आयुक्त संजय काटकर यांना विचारणा केली असता त्यांनी वाहतूक धोरणाबाबत कोणताच प्रस्ताव सादर करण्यात आला नसल्याचे सांगितले आहे. तर पालिकेकडे पोलीस अधिकारी देखील पाठपुरावा करत नसल्यामुळे कामास गती मिळत नसल्याचे पालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले आहे.

> वाहतूक धोरणाबाबत अद्यापही कोणताही प्रस्ताव माझ्यापुढे सादर झालेला नाही. मात्र जर असा प्रस्ताव पोलिसांनी यापूर्वी सादर केलेला असल्यास त्यास गती देण्याचे आदेश संबंधित विभाग अधिकाऱ्यांना देण्यात येतील.
>
> – संजय काटकर, आयुक्त, मिरा-भाईंदर महानगरपालिका

> वाहतूक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शहरात दिशादर्शक फलक उभारण्याबाबत महापालिकांना प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. या संदर्भात सतत पाठपुरावादेखील केला जात आहे.
>
> – प्रकाश गायकवाड, पोलीस उपायुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

लोकसत्ता पु.पा.९.

# लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने पोलीस यंत्रणा सज्ज

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** लोकसभा निवडणुकीच्या दृष्टीने आचारसंहिता लागू झाल्यानंतर मिरा-भाईंदरमधील पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. पोलिसांमार्फत शहरभरात 'ऑल आऊट', कोम्बिंग ऑपरेशन आणि नाकाबंदी मोहीम राबवण्यात येत आहे.

परिमंडळ 'एक'चे उपायुक्त प्रकाश गायकवाड यांच्यासह तीन सहायक आयुक्त, १२ वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील अधिकारी आणि कर्मचारी मोहिमेत सहभागी आहेत. या कारवाईदरम्यान अभिलेखावरील वॉन्टेड व फरार असलेले पाच आरोपी तपासण्यात आले, त्यात दोन आरोपी विविध गुन्ह्यांत फरार आणि विविध गुन्ह्यांत आरोपी असलेल्यांना अटक केली. एनडीपीएस कलमांतर्गत ११ जणांचा समावेश आहे. गंभीर गुन्ह्यांतील १७ आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. मिरा रोड, भाईंदर, उत्तन व काशिगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत कोम्बिंग ऑपरेशन करण्यात आले. तडीपार सात आरोपींना तपासण्यात आले. १७ ठिकाणी नाकाबंदी होती. यामध्ये दुचाकी, चारचाकी ३३७ वाहने तपासण्यात आली. १४९ चालकांवर कारवाई करण्यात आली.

मुंबई

लोकसत्ता ५-५-१.

# परदेशी नागरिकांना भाड्याने घरे देणे महागात

## ११ घरमालकांना अटक; तुळींज पोलीस ठाण्याची कारवाई

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** परदेशी नागरिकांना पोलिसांच्या परवानगीशिवाय परस्पर घरे भाड्याने देणाऱ्या ११ घर मालकांविरोधात नालासोपाऱ्यातील तुळींज पोलिसांनी गुन्हे दाखल करून त्यांना अटक केली आहे.

वसई, विरार शहरांत परदेशी नागरिकांमध्ये नायजेरीयन, बांग्लादेशी आणि इतर आफ्रिकन नागरिकांचे प्रमाण सर्वाधिक आहे. अनेक गुन्ह्यांच्या प्रकरणात परदेशी नागरिकांचा सहभाग आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे ते देशात प्रवेश करून वास्तव्य करतात. त्यामुळे घरे भाड्याने देताना पोलिसांचा 'ना हरकत दाखला' घेणे बंधनकारक आहे. परदेशी नागरिकांना घरे देताना 'सी' फॉर्म भरून पोलिसांचा ना हरकत दाखला घ्यावा लागतो. मात्र अनेक परदेशी नागरिक पोलिसांच्या अशा दाखल्याशिवाय रहात होते. या नागरिकांना घरे देणाऱ्यांविरोधातही पोलिसांनी कारवाई सुरू केली आहे. तुळींज पोलिसांनी अशा प्रकरणात एकूण ११ घरमालकांविरोधात कारवाई केली आहे. त्यांना अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले. त्यांच्यावर दोषारोपत्र दाखल केल्याने त्याना शिक्षा आणि दंड होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. घरात भाडेतत्वावर, तसेच हॉटेल, लॉजेस, क्लब, गेस्ट हाऊस इत्यादी ठिकाणी परदेशी नागरिक आल्यास त्यांची माहिती विहित प्रपत्रामध्ये २४ तासांच्या आत पोलिसांना देणे बंधनकारक आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीकोनातूनही ते महत्वाचे आहे, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. ही कारवाई अधिक तीव्र करण्यात येईल असे पोलीस आयुक्त मधुकर पांडे यांनी सांगितले.

### कुठल्या कलमाअंतर्गत कारवाई


**विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम ७ अन्वये कोणत्याही परदेशी नागरिकांना घर भाड्याने देताना २४ तासांच्या आत पोलिसाना कळवणे बंधनकारक असतं. त्यामुळे अशी माहिती दडवून ठेवणार्यांना भारतीय दंडविधान संहितेच्या कलम १८८, रिपोर्ट टू पोलीस ऑर्डर १९७१ च्या नियम २ अन्वये, तसेच विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ च्याकमल १४ अन्वये ही कारवाई करण्यात आली आहे.**

# मिरा-भाईंदरमध्ये पर्यावरणपूरक होळी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** होळीनिमित्त जाळण्यासाठी पर्यायी स्वरूपात पुढे आलेल्या शेणाच्या गोकाष्ठाच्या मागणीत यंदा पन्नास पटीने वाढ झाली आहे. यंदा १४० ठिकाणी पर्यावरणपूरक होळी साजरी केली जाणार आहे.

शहरात मोठी झाडे जाळली जात असल्यामुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषणात वाढ होत असते. त्यामुळे या प्रदूषणावर आळा बसावा म्हणून उत्तन येथील गो-शाळेतून एक अनोखी संकल्पना राबवली जात आहे. यात गायीच्या शेणापासून तयार करण्यात आलेल्या गोकाष्ठचा वापर जाळण्यासाठी करण्यात येत आहे. हे गोकाष्ठ हुबेहूब लाकडासारखे दिसून येतात.त्यामुळे प्रदूषण कमी होऊन पर्यावरपूरक उत्सव साजरा करण्यास मदत होते.



केशवसृष्टी हा उपक्रम गेल्या चार वर्षांपासून राबवत आहे. दररोज शेणापासून गोकाष्ठ बनवत आहे. या गो-शाळेत एकूण २५० गाई आहेत. त्याद्वारे दिवसाला तीन टन शेन गोळा करण्यात येते. शेणापासून गोकाष्ठ बनवण्यासाठी भारत विकास परिषदेने केशव सृष्टीला एक यंत्र दिले आहे. त्यानुसार एका दिवसात ४०० ते ५०० गोकाष्ठं गाईच्या शेणापासून तयार केली जात आहे. ही गोकाष्ठं सुखावण्यासाठी साधारण १२ दिवसांचा कालावधी लागतो.

### १४० ठिकाणी अंमल

**शेणापासून गोकाष्ठ बनवण्यासाठी महिन्याभरापासून सुरुवात झाली आहे. या गोकाष्ठना केवळ मिरा-भाईंदर नव्हे तर मुंबईतून ही मोठी मागणी येऊ लागली आहे. १४० ठिकाणी या लाकडांपासून होळी साजरी केली आहे. मागीलवर्षी हा आकडा ७० च्या जवळ होता. गोकाष्ठ जाळण्याने पर्यावरणाला कोणतीही इजा पोहचत नाही. पर्यावरणपूरक होळीचा आनंद लुटण्यासाठी लाकडांच्या जागी जास्तीत जास्त गोकष्ठाचाच वापर करावा, असे आवाहन गो शाळेतील व्यवस्थापक सुशील अग्रवाल यांनी केले आहे.**

पुण्यनगरी ५.५.१९.

# मीरा - भाईंदरमध्ये भाजपच्या दोन गटांत हाणामारी

## मेहता विरुद्ध व्यास वाद उफाळला, हाणामारीचा व्हिडीओ समाज माध्यमावर व्हायरल

**। मीरा रोडः** मीरा-भाईंदर मधील भाजपमध्ये गेल्या काही महिन्यांपासून गटबाजी सुरू आहे. या दोन गटात काही न काही कारणावरून वाद सुरूच आहे. भाईंदरमध्ये गुरुवारी झालेल्या एका बैठकीदरम्यान या दोन्ही गटात हाणामारी झाल्याचा प्रकार घडला आहे. या हाणामारीचे व्हिडीओ समाज माध्यमावरं व्हायरल झाले आहेत.या प्रकारामुळे मीरा भाईंदरच्या राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

मीरा भाईंदर शहरात माजी आमदार नरेंद्र मेहता व मीरा भाईंदर विधानसभा प्रमुख रवी व्यास यांच्यामध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून वाद सुरू आहे. भाजपमध्ये दोन गट तयार झाले आहेत. रवी व्यास यांची जिल्हाध्यक्षपदी निवड केल्यापासून मीरा भाईंदर भाजपमध्ये रवी व्यास व नरेंद्र मेहता असे दोन गट तयार झाले. मेहता यांनी व्यास यांना सतत विरोध केल्यामुळे भाजप वरिष्ठांनी काही महिन्यांपूर्वी जिल्हाध्यक्ष पदावरून रवी व्यास यांना हटवून मेहता समर्थक किशोर शर्मा यांची जिल्हाध्यक्षपदी निवड केली. व रवी व्यास यांची मीरा भाईंदर विधानसभा प्रमुखपदी निवड केली. वरिष्ठांनी अनेक वेळा या गटातील वाद मिटवण्याचा प्रयत्न केला.परंतू हा वाद मिटताना दिसत नाही.

आगामी लोकसभा निवडणुका जाहीर झाल्या आहेत. या निवडणुकीत ठाणे लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचा उमेदवार दिल्यास त्या उमेदवाराचा प्रचार करणार नसल्याचे सांगत मेहता यांनी विरोध केला आहे. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर राजकीय वातावरण चांगलेच तापू लागले आहे. मीरा-भाईंदर भाजपकडून गुरुवारी सायंकाळी गोल्डन नेस्ट येथील ब्लू मुन क्लब मध्ये भाजप पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची विशेष बैठकीचे प्रदेश कार्यकारणीने आयोजन केले होते. या बैठकीला मीरा भाईंदर भाजपचे प्रभारी जयप्रकाश ठाकूर उपस्थित होते.या बैठकीत माजी आमदार नरेंद्र मेहता व रवी व्यास यांच्या गटातील कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी या बैठकीत लावण्यात आलेल्या बॅनरवर रवी व्यास यांचा फोटो लहान लावला असल्याचे कार्यकर्ते सांगत होते. तसेच व्यास यांचे बैठकी दरम्यान नाव घेतले नसल्यामुळे व व्यास यांना डावलले जात असल्याने त्यांचे समर्थक संतप्त झाले होते. काही वेळाने हे संतप्त कार्यकर्ते



थेट मंचावर चढले. हे पाहून नरेंद्र मेहता समर्थक देखील आक्रमक झाले. सुरुवातीला शाब्दिक वादाने सुरु झालेल्या हा वाद काही वेळातच हाणामारीवर पोहचला.त्यामुळे जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा यांनी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न केला. परंतू व्यास यांच्या कार्यकर्त्यांनी त्यांना देखील मारहाण केल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे या दोन्ही गटातील वाद वाढून हाणामारी झाल्याचे बोलले जात आहे. त्यानंतर ही बैठक तहकूब केली असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले आहे. या प्रकारामुळे मीरा भाईंदरच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

CamScanner

पुढारी ५.पा.१.

# आ. नितेश राणे, गिता जैन, टी. राजा यांच्या विरोधात याचिका

## द्वेषपूर्ण वक्तव्य केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची मागणी

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

मीरारोड येथील रामभक्तांच्या रॅलीवर काही मुस्लिम तरुणांनी हल्ला करून रॅलीतील लोकांना जखमी केले. तसेच हिंदूविरोधात आक्षेपार्ह पोस्ट समाज माध्यमांवर व्हायरल केल्याविरोधात भाजप आ. नितेश राणे, आ. टी. राजा व अपक्ष आ. गिता जैन यांनी द्वेषपूर्ण वक्तव्य केले. याचप्रमाणे त्यांनी मुंबईच्या शिवाजीनगर व घाटकोपर पोलीस ठाण्याच्या हद्दीत जानेवारी व फेब्रुवारी दरम्यान द्वेषपूर्ण वक्तव्य केल्याप्रकरणी या तिन्ही आमदारांवर विविध कलमांनुसार एफआयआर नोंदविण्यासाठी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील पाच रहिवाशांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे.

यात याचिकाकर्ते आफताब सिद्दिकी, अशफाक अली अकबरअली शेख, असगर अली शकूर राईन, इस्माईल खान आणि सज्जाद खतीब यांचा समावेश आहे. तत्पुर्वी याचिकाकर्त्यांनी नयानगर पोलीस ठाण्यासह शिवाजीनगर व घाटकोपर पोलीस ठाण्यात धाव घेऊन या तिन्ही आमदारांविरोधात एफआयआर नोंदविण्याची मागणी पोलिसांकडे केली होती. पोलिसांनी एफआयआर नोंद न केल्यामुळेच याचिकाकर्त्यांना उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागल्याचे सांगण्यात आले. याचिकाकर्त्यांनी याचिकेत दंगल घडविण्याच्या उद्देशाने चिथावणी दिल्याप्रकरणी भादंविसं मधील कलम १५३, दोन गटांमधील वैर वाढविण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी कलम १५३अ व १५३ ब, पूजेचे ठिकाण अपवित्र केल्याप्रकरणी २९५अ तसेच सार्वजनिक शांतता भंग करणारी विधाने केल्याप्रकरणी ५०४ व ५०५ अन्वये एफआयआर नोंदविण्याची मागणी केली आहे.



### पोलिसांना द्वेषपूर्ण भाषणांच्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदविण्याचे निर्देश

याचप्रमाणे याचिकाकर्त्यांनी, पोलिसांकडून या तिन्ही आमदारांविरुद्ध एफआयआर नोंदवणे आवश्यक होते. कारण देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने पोलिसांना द्वेषपूर्ण भाषणांच्या प्रकरणांमध्ये एफआयआर नोंदविण्याचे निर्देश दिल्याचा युक्तिवाद केला आहे. तसेच ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत घटना घडली आहे त्या मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस ठाण्यांतर्गत नयानगर पोलीस ठाण्यासह मुंबई पोलिस आयुक्तालयातील शिवाजीनगर व घाटकोपर पोलीस ठाण्यांतर्गत या तिन्ही आमदारांनी जानेवारी व फेब्रुवारी दरम्यान द्वेषपूर्ण वक्तव्य केल्याविरोधात एफआयआर नोंदविण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी मागणी याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

म.टा- ५- पा- १.

## सराईत दुचाकीचोर अटकेत

**मिरा-भाईंदर :** मिरारोडमधील दुचाकीचोरीच्या प्रकरणात एका सराईत वाहनचोराला अटक करण्यात आली आहे. मिरारोड गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून ही कारवाई करण्यात आली आहे. अटक आरोपीविरोधात ठाणे व मुंबईत १३ हून अधिक वाहनचोरीचे गुन्हे दाखल असल्याचे समोर आले आहे.

मिरारोडच्या शिवार गार्डन परिसरात ज्योती सिंग यांनी १७ मार्च रोजी दुचाकी उभी केली होती. काही वेळानंतर आपली दुचाकी तेथे दिसून न आल्याने ती चोरीला गेल्याचे ज्योती यांच्या लक्षात आले. त्यांनी मिरारोड पोलिस ठाण्यात याविषयी तक्रार केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता. प्रकरणाचा तपास सीसीटीव्ही आधारे गुन्हे प्रकटीकरण कक्षाने सुरू केला होता. यावेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे मिरा-भाईंदर रस्त्यावर असणाऱ्या एका इमारतीमधून अल्ताफ अली खानला अटक करण्यात आली आहे. २००८ पासून तो वाहनचोरी करीत होता.

## मिरा-भाईंदरमध्ये कोम्बिंग ऑपरेशन

**मिरा-भाईंदर :** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मिरा-भाईंदरमध्ये पोलिसांकडून नाकाबंदी आणि कोंबिंग ऑपरेशन नुकतेच राबविण्यात आले. सराईत गुन्हेगारांची झाडाझडती, अमली पदार्थांची विक्री, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि इतर प्रकरणात शेकडोजणांवर कारवाई करण्यात आली आहे.

लोकसभा निवडणुकीच्या काळात मिरा-भाईंदरमध्ये कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती नियंत्रणाखाली राहावी यासाठी पोलिस प्रशासन सज्ज झाले आहे. पोलिस आयुक्त मधुकर पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध पोलिस ठाण्यात कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या मदतीने १९ ठिकाणी नाकाबंदी करण्यात आली. यासह कोम्बिंग ऑपरेशन राबवण्यात आले. यावेळी २ फरार आरोपींना अटक करण्यात आली आहे. अमली पदार्थ विक्री व बाळगल्या प्रकरणी ११ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

म. टा. पु. पा. १.

# पोलिस यंत्रणा सज्ज

## होळी-धुळवडीच्या पार्श्वभूमीवर विशेष खबरदारी

- मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर नजर
- समुद्रकिनारी जाणाऱ्या वाहनांची तपासणी

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसईत होळी आणि धुळवडीचा सण पारंपरिक पद्धतीने साजरा करण्यासाठी तयारी सुरू असून, सणासुदीच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलिस यंत्रणा सज्ज झाली आहे. धुळवड साजरी करताना रंगाचा बेरंग होऊ नये म्हणून, मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांची करडी नजर असणार आहे.

वसई, विरारमध्ये पारंपरिक पद्धतीने होळीचा सण उत्साहात साजरा केला जातो. रविवारी असलेल्या होळी सणासाठी नागरिकांची दरवर्षीप्रमाणे तयारी सुरू आहे. रात्रीच्या वेळी होणाऱ्या होळी दहनावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ठिकठिकाणी शहरात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. दुसऱ्या दिवशी, म्हणजेच सोमवारी साजऱ्या होणाऱ्या धुळवडीच्या दिवशी काही अतिउत्साही लोकांकडून मद्यपान करून वाहने चालविण्याचे प्रकार घडतात. हे प्रकार रोखण्यासाठी वाहतूक पोलिसांनी तयारी केली आहे. मद्यपान करून वाहने चालविणाऱ्यांवर, वेगाने वाहने चालविणाऱ्यांवर, दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्यांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात येणार आहे. वसईतील भाबोळा, अंबाडी रोड, रेंज नाका, सातिवली, नालासोपारा, विरार या ठिकाणी पोलिसांची नाकाबंदी असणार आहे.

अनेक नागरिक धुळवड साजरी करण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर जातात. त्यामुळे या दिशेने जाणाऱ्या आणि येणाऱ्या वाहनचालकांची तपासणी करण्यात येणार आहे. मुख्यतः गर्दीच्या ठिकाणी विशेष लक्ष केंद्रित करण्यात येणार असून यासाठी पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीतील पोलीस ठाण्याचे अधिकारी, पोलीस उपनिरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक, बिट मार्शल, पोलिस कर्मचारी यांची शहरात करडी नजर असणार आहे. गस्त घालण्यासह, नाकाबंदी, तपासणी करण्यात येणार असल्याचे पोलिस आयुक्तालयाने सांगितले.



### किनारपट्टीवर विशेष बंदोबस्त

धुळवडीच्या दिवशी काही लोक मद्यपान करून खासगी वाहनांनी वसईच्या पश्चिम पट्ट्यातील भुईगाव, कळंब, राजोडी, नवापूर आणि अर्नाळा या समुद्रकिनाऱ्यांवर जातात. वाहतुकीचे नियम पायदळी तुडवून हुल्लडबाजी करणाऱ्या नागरिकांवर वचक राहावा, तसेच कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून वसईतील पश्चिम पट्ट्यात या दिवशी दरवर्षीप्रमाणे विशेष पोलिस बंदोबस्त ठेवण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेश प्रमुख समीर वर्तक यांनी पोलिस उपायुक्त पौर्णिमा चौगुले आणि जयंत बजबळे यांच्याकडे केली आहे.

### मिरा-भाईंदरमध्येही सज्जता

मोठ्या उत्साहात साजऱ्या करण्यात येणाऱ्या होळी आणि धुळवडीच्या दिवशी मिरा-भाईंदरमध्ये कोणतीही अनुचित घटना घडू नये, यासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. शहरात जागोजागी नाकाबंदी करण्यात येणार असून अतिउत्साही व्यक्तींवर नजर ठेवण्यासाठी गस्त घातली जाणार आहे. विविध हॉटेलांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमांमध्ये महिला सुरक्षेच्या दृष्टीने उपयोजना करण्यास सांगण्यात आले आहे. अमली पदार्थांची विक्री तसेच सेवन करणाऱ्यांवरही विशेष लक्ष असणार असल्याची माहिती पोलिस उपायुक्त प्रकाश गायकवाड यांनी दिली.

---



मुंबई-अहमदाबाद महामार्गाच्या काँक्रिटीकरणावर खड्डे पडलेले दिसत आहेत.

← लोकमत पु. पा. ४.

# अहमदाबाद महामार्गावर काँक्रिटीकरणानंतर खड्डे

## वाहनचालकांत संताप : दर्जाबाबत प्रश्न

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** तलासरी ते दहिसर अशा सुमारे १३१ किलोमीटरच्या मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील रस्त्याचे सध्या सरसकट काँक्रिटीकरण सुरू आहे. आधीच ठेकेदाराने महामार्गावर काँक्रिटीकरणासाठी कोणतेच नियोजन ठेवलेले नसताना त्यात कामाच्या दर्जावर प्रश्न उभा राहिला आहे. काही ठिकाणी महामार्गावर काँक्रिटीकरणानंतर खड्डे पडल्याचेही दिसून येत आहे. तसेच चुकीच्या डायव्हर्शनमुळे वाहनचालकांची त्रेधा उडत असल्याने वाहनचालकांत संताप व्यक्त होत आहे.

### खबरदारी घेणे गरजेचे

महामार्गावर सिमेंट काँक्रिटीकरण करत रस्ता निर्जीव असताना तेथे योग्य खबरदारी ठेकेदाराकडून घेणे सयुक्तिक आहे, मात्र कोणतीच ख़बरदारी ठेकेदाराकडून घेतली जात नसल्याने ओल्या काँक्रिटीकरण रस्त्यावरून वाहने भरधाव वेगाने जात असल्याने रस्त्यावर खड्डे तसेच वाहनांच्या चाकांचे निशाण दिसू लागले आहेत. रस्ता अधूनमधून फुटला असल्याचे दिसून येते. बापाणे वासमाच्या खाडीपासून ते पुढे ससुपाडापर्यंत चुकीचे डायव्हर्शन लावल्याने वाहनचालक त्रस्त आहेत.

CamScanner

लोकमत ५.४.१

## लग्नाचे आमिष देऊन बलात्कार



**नालासोपारा :** विरारमध्ये राहणाऱ्या २७ वर्षीय तरुणीवर आरोपीने लग्नाचे आमिष दाखवून १३ सप्टेंबर २०१९ ते ६ मार्च २०२४ दरम्यान अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपीने पीडित तरुणीशी अनेकदा शारीरिक संबंध ठेवून तिच्याकडून रोख रक्कम आणि दीड तोळ्याचे सोन्याचे ब्रेसलेट घेऊन फसवणूक केली आहे. मांडवी पोलिसांनी गुरुवारी गुन्हा दाखल केला आहे.

## तुळिंजमध्ये दुचाकीची चोरी



**नालासोपारा :** नागिनदास पाड्यातील ओम नगर येथील साई किरण चाळीत राहणाऱ्या सागर यादव (२६) या तरुणाची ३० हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. त्याने १७ मार्चला पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास नालासोपारा रेल्वे स्टेशनच्या बाजूस ब्रिजखाली श्री साई छाया हॉटेलसमोर पार्क केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे. तुळिंज पोलिसांनी गुरुवारी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## वॉशिंग मशिनची दुकानातून चोरी

**नालासोपारा :** वीर सावरकर मार्गावरील मकवाना कॉम्प्लेक्समधील शॉप नंबर ४ मधून गुरुवारी दुपारी १ वाजण्याच्या सुमारास आरोपीने ११ हजार ४०० रुपये किमतीची वॉशिंग मशिन चोरी करून नेली आहे. इलेक्ट्रॉनिक दुकानाचे मालक संजय जैन (४२) यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

## लाखोंचा गुटखा पकडला

**नालासोपारा :** गौराई नाका येथे आरोपी गणेश खरवड (४२) याने दुकानात वेगवेगळ्या कंपनींचा १ लाख ९८ हजार ७५० रुपये किमतीचा गुटखा विक्रीकरिता ठेवलेला पेल्हार पोलिसांना आढळला. पेल्हार पोलिसांनी आरोपीविरोधात बुधवारी कारवाई करून गुन्हा दाखल करत अटक केली आहे.

## महिलेची फसवणूक

**नालासोपारा :** वसईच्या तरखड गावात राहणाऱ्या मालती राऊत (७३) या वृद्ध महिलेची फसवणूक झाल्याची घटना घडली आहे. मालती या गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास होळी मार्केटमधील एकनाथ कम्युनिकेशन या दुकानाजवळ फुले विकत घेण्यासाठी गेल्या होत्या. त्यावेळी २ आरोपींनी त्या वृद्ध असल्याचा फायदा घेऊन त्यांना बोलण्यात गुंतवून येथे पोलिस तपासणी सुरू असल्याचा खोटा बनाव केला. तसेच हातचलाखीने त्यांच्या गळ्यातून ४५ हजारांची सोन्याची चेन लांबवून त्यांची फसवणूक केली. वसई पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## महिलेने संपवले जीवन

**नालासोपारा :** वसईच्या मूनस्टोन राजहंस ड्रीम्स या इमारतीत राहणाऱ्या प्रीती काळे (६२) यांनी गुरुवारी सकाळी सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास मानसिक आजार तसेच कॅन्सरच्या आजाराला कंटाळून इमारतीच्या १३ व्या मजल्यावरील गॅलरीतून खाली उडी मारून आत्महत्या केली आहे. माणिकपूर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत ५.४.५

## दोन नायजेरियनना गांजासह अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** अमली पदार्थविरोधी कक्षाच्या पोलिसांनी प्रगतीनगरच्या बसेरा गार्डन इमारतीजवळ गुरुवारी दोन नायजेरियन आरोपींना गांजासह पकडले आहे. तुळींज पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

आरोपी ईसा लकी (३१) याच्याकडे ७ हजार रुपयांचा ३२१ ग्रॅम आणि जाना मिशेल (३०) याच्याकडे ९ हजार रुपयांचा ४२१ ग्रॅम गांजा आढळला आहे. तसेच या दोन्ही आरोपींनी भारत देशात राहण्याबाबत कोणतीही वैध कागदपत्रे सादर केली नाही.

पोलिस हवालदार महेश पागधरे यांनी तुळींज पोलिस ठाण्यात दोन्ही आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपीकडून गांजा, तीन मोबाइल असा एकूण ५६ हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.

CamScanner

लोकमत पु. पा. ३.

# कंटेनर कार्यालयांविरोधात धडक कारवाई

## मनवेलपाड्यात रस्त्यात होते अतिक्रमण : नागरिकांची झाली वाट मोकळी

लोकमत न्यूज नेटवर्क

**वसई :** वसई-विरार महापालिका 'ब' प्रभाग समितीअंतर्गत येणाऱ्या विरार मनवेलपाडा नाना-नानी पार्क येथील रस्त्यात अनधिकृतपणे थाटण्यात आलेल्या कंटेनर कार्यालयांवर मंगळवारी धडक कारवाई करण्यात आली.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांच्या आदेशानंतर अतिक्रमण विभागाच्या उपायुक्त संघरत्ना खिल्लारे व प्रभारी सहायक आयुक्त संजीव पाटील यांनी पोलिस बंदोबस्तात ही कारवाई केली. या रस्त्यावरील अतिक्रमणे हटविण्यात यावीत, यासाठी गेली दोन वर्षे परिसरातील नागरिक व प्रसारमाध्यमे सातत्याने पाठपुरावा करत होती, मात्र राजकीय दबावापुढे या कार्यालयांवर कारवाई करणे टाळले जात होते. मात्र आचारसंहिता लागू होताच अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे यांनी कारवाई करीत सामान्य नागरिकांची वाट मोकळी करून दिली आहे.

विरार पूर्वेकडील नाना-नानी पार्कसमोरील रस्त्यावर जय भवानी कोकण संस्थेच्या नावाने सुसज्ज कंटेनर कार्यालय थाटण्यात आलेले होते.



विरार-मनवेलपाड्यात नाना-नानी पार्क येथील रस्त्यात अनधिकृतपणे थाटण्यात आलेल्या कंटेनर कार्यालयांवर मंगळवारी महापालिकेने धडक कारवाई केली.

- या रस्त्यावर बँक ऑफ बडोदा, वसई सहकारी बँक, अपना सहकारी बँक व अन्य नामांकित बँका व आस्थापनांची कार्यालये आहेत. त्यामुळे या बँकांत आणि आस्थापनांत अनेक सामान्य नागरिक विविध कामांनिमित्ताने येत असतात, मात्र या कार्यालयाने त्यांचा रस्ता अडवल्याने परिसरातील नागरिक आणि सरकारी बँकांतून अनेकदा पालिकेकडे तक्रारी करण्यात आलेल्या होत्या. पालिकेने मात्र या तक्रारींची साधी दखलही घेतली नव्हती.

- कंटेनर कार्यालय राजकीय पक्षाशी संबंधित व्यक्तीचे असल्याने तत्कालीन उपायुक्त अजित मुठे, किशोर गवस व अन्य प्रभारी सहायक आयुक्त या कार्यालयांवर कारवाई करण्यास धजावत नव्हते. विशेष म्हणजे लोखंडी कंटेनर स्वरूपातील राजकीय पक्ष, संस्था व दुकानदार यांची अनधिकृत कार्यालये व फूड ट्रक हटविण्यासंदर्भात मीरा-भाईंदर महानगरपालिका आग्रही असताना वसई-विरार महापालिका मात्र याबाबत बोटचेपी भूमिका घेत असल्याने नागरिकांनी पालिकेविरोधात संताप व्यक्त केला होता.

रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्रालयाने केले बंधनकारक

# मुलाला शाळेत नेणाऱ्या बसमध्ये 'एफएपीएस' यंत्रणा आहे?

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** विद्यार्थी वाहतुकीसाठी शाळांतर्फे खासगी बससेवा उपलब्ध करून दिली जात आहे. त्यामुळे या बसमधून पालक मुलांना शाळेत पाठवत असतात. मात्र, ज्या बसमधून मुले जातात ती बस पाल्याच्या दृष्टीने सुरक्षित आहे का, हे पाहणेही आवश्यक आहे.

मुलाला शाळेत नेणाऱ्या बसमध्ये 'एफएपीएस' यंत्रणा कार्यान्वित करण्याचे आदेश रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने बंधनकारक केले आहे. वसईतही पाचशेहून अधिक स्कूल बस धावत आहेत. मात्र, अनेक बसमध्ये ही यंत्रणा बसवली नसल्याचे दिसून येते.





### शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनात बंधनकारक

शालेय वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये फायर अलार्म ॲण्ड प्रोटेक्शन सिस्टिम (एफएपीएस) यंत्रणा बसविणे, रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने बंधनकारक केले आहे.

### विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी सुमारे ५०० वाहने

शहरातील अनेक शाळांतील विद्यार्थी स्कूल बसने शाळेत जातात. वसईमध्ये सुमारे पाचशेहून अधिक बस या विद्यार्थ्यांची ने-आ करीत आहेत.

### काय आहे एफपीएस यंत्रणा?

फायर अलार्म ॲण्ड प्रोटेक्शन सिस्टिम (एफएपीएस) यंत्रणा म्हणजे एखादा वेळी एखाद्या वाहनात आग लागली तर पॅनिक बटनद्वारे फायर अलार्म वाजतो. त्यामुळे सावधानतेचा इशारा मिळून पुढील संभाव्य धोका तसेच होणारी हानी टाळता येते. यासंदर्भातील अधिसूचना केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने २०२२ मध्ये जारी केली आहे. नव्या वाहनात ती सुविधा कंपनीने दिली आहे.

### आगीने होणारे अपघात टळतील

शाळेच्या बसना अपघात होण्याच्या घटना घडतात. आग लागण्याच्या घटनाही याआधी घडलेल्या आहेत. स्कूल बसला एफएपीएस यंत्रणा बसवणे हे रस्ते वाहतूक, महामार्ग मंत्रालयाने बंधनकारक केले आहे. यामुळे आग लागून होणारे अपघात टळले जातील, असे आरटीओ प्रशासनातर्फे सांगितले आहे.

शालेय विद्यार्थ्यांच्या वाहतुकीचा परवाना असलेल्या वाहनातूनच विद्यार्थ्यांची वाहतूक करणे बंधनकारक आहे. शालेय विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या परवानाप्राप्त वाहनचालकांनी सर्व अटी व शर्तींचे काटेकोरपणे पालन करावे.

\- आरटीओ प्रशास

लोकमत पु-पा-३.

# 'फेक न्यूज' शेअर कराल तर मात्र पोलिस कोठडीत जाल

रिॲलिटी चेक

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**नालासोपारा :** लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. आचारसंहितेचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर तत्काळ गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. सोशल मीडियाद्वारे चुकीची माहिती पसरविणाऱ्या फेक न्यूजवरही विशेष लक्ष राहणार आहे. फेक न्यूज म्हणजे ज्यामधील मजकूर हा चुकीचा, बनावट किंवा तयार केलेला असतो. त्यातील तपशील, सोर्सेस, माहिती कोण देतेय याबाबत सत्यता तपासलेली नसते. अनेकदा असे मजकूर, माहिती विविध माध्यमातून सोशल मीडियावर पसरविली जाते. मात्र आता अशा फेक न्यूज शेअर करणाऱ्यांवरही पोलिसांकडून कारवाई केली जाणार आहे.

पालघर मतदारसंघात चौथ्या टप्प्यात मतदान होणार आहे. त्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.

## तक्रार कोठे कराल?

कुठल्याही माहितीची खातरजमा न करता त्यातील सत्यता न पडताळता ती माहिती सोशल मीडियावर शेअर केल्यास गुन्हा दाखल होऊ शकतो. फेक न्यूजसंदर्भात तक्रार करायची असेल तर ती स्थानिक पोलिस ठाण्यात अर्ज देऊन करता येते. सायबर क्राइमला देखील तक्रार करता येते.

## निवडणुकीच्या काळात भरारी पथके

सोशल मीडियावर अनोळखी व्यक्तींकडून खोटी माहिती अथवा बातमी टाकली जाते. लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे निवडणुकीच्या काळात अशा फेक न्यूजवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी निवडणूक आयोगाकडून भरारी पथकांची निर्मिती करण्यात आली आहे.

## सायबर कक्षाचे विशेष लक्ष

- दोन समाजात तेढ निर्माण होईल, धार्मिक, जातीय भावना दुखावतील अशा पोस्ट, व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित होऊ नये, यासाठी पोलिस दक्ष आहेत.
- तसेच 'फेक न्यूज'ही काही जणांकडून पसरविल्या जातात. ऑनलाइन फेक न्यूज, आक्षेपार्ह पोस्ट प्रसारित करणाऱ्यांवरही सायबर कक्षाचे लक्ष असणार आहे.

अनेकदा सोशल मीडियावर फॉरवर्डेड मेसेज मोठ्या प्रमाणात दिसतात. कसलीही खातरजमा न करता केवळ स्वत:ला आवडला म्हणून मेसेज फॉरवर्ड केला जातो. पण असे करणाऱ्यांनाही आता शिक्षा होऊ शकते.




खोटी माहिती पसरवल्यास निवडणूक आयोगातर्फे दिलेल्या निर्देशाप्रमाणे कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच भारतीय दंड संहिता व माहिती तंत्रज्ञान कायदा (आयटी ॲक्ट) नुसारसुद्धा कठोर कारवाई करण्यात येईल.

- सायबर विभाग

## न्यूजवर करडी नजर

गेल्या दोन ते तीन वर्षांचा आढावा घेता आक्षेपार्ह पोस्टबाबत दाखल झालेल्या तक्रारींवर गुन्हे दाखल झाले आहेत. पण, फेक न्यूजसंदर्भात तक्रारीसाठी लोक पुढे येत नाहीत. त्यामुळे गुन्हा दाखल झालेला नाही. परंतु, अशा न्यूजवर यंत्रणांची करडी नजर राहील, असे पोलिस विभागाकडून सांगण्यात आले.

# MBVV top cop acts tough: 11 landlords held for not sharing info about tenants



**While landlords who do not abide by the rule will be liable for legal action, our drive will continue until the issue of such non-reporting as mandated by law is weeded out from the region.**

**Madhukar Pandey, CP**

SURESH GOLANI
MIRA-BHAYANDAR

The Mira Bhayandar-Vasai Virar (MBVV) police have registered cases against 11 landlords in Nallasopara for failing to share information while leasing out flats, houses or any type of commercial establishments. They were arrested under section 188 (disobedience to order duly promulgated by public servant) of the Indian Penal Code and provisions of the Foreigners Act and produced before the court.

Stung by the alarming presence of foreign nationals illegally staying in the region, the MBVV police has been regularly issuing directives and creating awareness to remind property owners and estate agents about their duty of intimation before carrying out rental transactions.

Apart from landlords, it is binding upon establishments including – hotels, lodges, clubs and guest houses – to submit details of their foreign tenants/guests in the prescribed format to the local police station within 24 hours. Besides paying fines, convictions in such cases can also attract jail terms. The mandate is also applicable for establishments and private companies who employ foreign nationals.

Commissioner of Police Madhukar Pandey said, "While landlords who do not abide by the rule will face legal action, our drive will continue until the issue of such non-reporting as mandated by law is weeded out from the region."

It has come to light that some miscreants change their rental accommodations without intimation and manage to overstay in the country only because the landlords and agents do not abide by the rules. The Pragati Nagar and Moregaon area has become a favourite destination for Nigerian nationals seeking accommodation facilities, sources said.

CamScanner

हमारा महानगर

epaper.hamaramahanagar.net
23 Mar 2024 - Page 2

# तुलिंज पुलिस स्टेशन ने की 11 मकान मालिकों के खिलाफ कार्रवाई

**महानगर नेटवर्क**

**नालासोपारा**

विदेशी नागरिकों को कमरे किराए पर देने के बारे में पुलिस स्टेशन को सूचित नहीं करने पर तुलिंज पुलिस स्टेशन ने 11 मकान मालिकों के खिलाफ कार्रवाई की है। यह जानकारी पुलिस अधिकारी ने शुक्रवार को दी है। पुलिस अधिकारी ने कहा कि, मीरा-भाईंदर, वसई-विरार पुलिस आयुक्तालय, तुलिंज पुलिस स्टेशन की सीमा के भीतर प्रगतिनगर और मोरेगांव क्षेत्रों में,बड़ी संख्या में विदेशी नाइजीरियन और अन्य अफ्रीकी देशों के नागरिक किराये के आधार पर घर ले रहे हैं। विदेशी अधिनियम, 1946 की धारा 7 के तहत,व्यवसायिक आधार पर किसी भी विदेशी नागरिक के निवास के 24 घंटे के भीतर स्थानीय पुलिस को सूचित करना अनिवार्य है। ऐसा नहीं करने पर उनके खिलाफ मामला दर्ज करने का प्रावधान है। चूंकि कुछ मकान मालिकों ने उनके साथ पट्टे पर रहने के लिए आने वाले नाईजीरियन और अन्य अफ्रीकी नागरिकों के बारे में पुलिस स्टेशन को सूचित नहीं किया था,कुल 11 मकान मालिकों के खिलाफ तुलिंज पुलिस स्टेशन में मामला दर्ज किया गया और मकान मालिकों को गिरफ्तार कर अदालत में पेश किया गया। इसलिए उक्त गृह मालिकों के विरुद्ध न्यायालय में आरोप पत्र दाखिल कर आरोपित गृह मालिकों को कारावास व जुर्माना भुगतना होगा। इसलिए पुलिस सभी नागरिकों से अपील कर रही है कि अगर वे विदेशी किरायेदार रखते समय उनकी जानकारी पुलिस थाने को नहीं देंगे तो उनके खिलाफ मामला दर्ज कर कोर्ट में मामला भेजा जायेगा।

**विदेशी नागरिकों को घर देने पर पुलिस को सूचित करना अनिवार्य**

CamScanner